**एकाच ग्रामपंचायती अंतर्गत येणारी गावे/ वाडया यांच्यासाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,**
**शासन निर्णय क्र. ग्रापापू-१००२/प्र.क्र. ५४२/पापु-०७**
**मंत्रालय , मुंबई-४०० ०३२, दिनांकः- १६ ऑगस्ट , २००२**

**वाचा : १.** शासन निर्णय , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग , क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र. ३२८/पापू-०७, दि. २७ जुलै २०००.

२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापू-१००१/प्र.क्र. १९०/पापू-०७ , दि. ३ सप्टेंबर २००१.

**शासन निर्णय :**

ग्रामीण पाणी पूरवठा कार्यक्रमासाठी संदर्भातील क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये सुधारित धोरण लागू करण्यात आले आहे . या सुधारीत धोरणानुसार एखाद्या गावास / वाडीस पाणी पुरवठा योजना आवश्यक असल्यास, ते गाव /वाडी ज्या ग्रामपंचायती अंतर्गत अंतर्भुत आहे, त्या गावाच्या /वाडीच्या ग्रामसभेने तशी मागणी करणे संदर्भातील क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये आवश्यक करण्यात आले आहे .

२. अनेकदा एका ग्रामपंचायती अतंर्गत अनेक गावे किंवा वाडया यांचा अतंर्भाव असतो . बरेचदा प्रत्येक गाव अथवा वाडी स्वतंत्र वस्ती स्वरुपात असून या गाव व वाडयांमधील अंतरही बरेचसे असते. त्यामुळे काही वेळा ग्रामपंचायतीस एकच पाणीपुरवठा योजना आर्थिक व व्यावहारिदृष्टया कार्यान्वित करणे शक्य नसते. अशा परिस्थितीत, संबंधित गावाने अथवा वाडीने स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेची मागणी केल्यास व ती योजना आर्थिक, तांत्रिक व व्यावहारीकदृष्टया योग्य असल्यास, शासनाच्या सर्व निकषात बसत असल्यास, अशा वाडी/ गावातील लाभार्थी लोकसहभागाची रक्कम भरणेस तयार असतील व योजनेची देखभाल दुरुस्ती करण्यासही तयार असतील, तर त्या गावास /वाडीस योजना देणे आवश्यक आहे.

३. परंतू, संदर्भातील क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार आता योजना निश्चित करुन त्याची मागणी करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला (ग्रामसभेला) देण्यात आले असल्याने ग्रामपंचायत स्तरावर योजनेची मागणी ग्रामसभेत ठराव करुन करावयाची आहे. तथापि, एखाद्या ग्रामपंचायती अंतर्गत येणा-या गावाची /वाडीची सर्व निकषात बसणारी ग्राहय अशी मागणी बहूमताच्या जोरावर मुख्य गावातील लोकांनी अमान्य केल्यास संबंधित गावाने/वाडीने त्यांचे स्तरावर सर्व लाभार्थी कुटुंबांची सभा घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे तसा प्रस्ताव परस्पर सादर करावा. असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा ग्रामसभेचा संपूर्ण निर्णय तपासून संबंधित गावाने/वाडीने केलेल्या योजने संदर्भातील प्रस्ताव तांत्रिक. आर्थिक व व्यावहारीक दृष्टया योग्य आहे किंवा कसे हे तपासून त्याबाबतचा आपला सविस्तर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी शासनास सादर करावा.



४९७

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सादर केलेला अहवाल व इतर सर्व अनुषंगिक बाबी तपासून या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील . शासनाने घेतलेला निर्णय ग्रामसभेवर व अशी मागणी करणा-या गावावर/वाडीवर/वस्तीवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

**( बी. सी. खटुआ)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव,
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय , मुंबई,
विभागीय आयुक्त (सर्व)
मा. मुख्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मंबई,
संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व),
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व),
प्रादेशिक मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व ),
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व),
कार्यकारी अभियता , लघुपाटबंधारे , जिल्हा परिषद (सर्व),
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत ), जिल्हा परिषद (सर्व),
उपअभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व),
जिल्हा वरीष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , (सर्व),
तहसीलदार (सर्व),
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),
ग्रामपंचायती (सर्व),
मंत्रालयातील सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने ,
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.



४९८